# विद्याविकास प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी मधील विद्यार्थिनी वैष्णवी येलदी यांची चमकदार कामगिरी




डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ अंतर्गत राज्यस्तरीय आंतरविभागीय तंत्र शिक्षण व फार्मासी महाविद्यालयाच्या निवड बुद्धिबळ स्पर्धेत मुलींच्या गटात सोलापूर विभागाच्या V.V.P कॉलेजमधील विद्यार्थिनी वैष्णवी येलदी हिने द्वितीय क्रमांक पटकाविला.

V.V.P कॉलेजमधील AI&DS डिपार्टमेंट मधील विद्यार्थिनी वैष्णवी हिने चार गुण व 13 बोकोलक्स गुणांसह दुसरा क्रमांक पटकाविला. मुलीत सोलापूर विभागाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकाविले. तसेच पुढे नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तसेच ऑल इंडिया चेस वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

वैष्णवी तिच्या या कामगिरीमुळे कॉलेजमध्ये आनंदाचे वातावरण असून तिने खेळ व शिक्षण यांचा उत्कृष्ट समतोल साधत प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर अरुण गायकवाड यांनी तिचे कौतुक करताना म्हणाले की बुद्धिबळ केवळ एक

खेळ नसून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणारे अमूल्य साधना आहे. सततचा सराव, ध्येय आणि संयम यांच्या मदतीने कोणताही विद्यार्थी एक उत्तम बुद्धिबळपटू बनू शकतो. या खेळातून विकसित होणारी विचारशक्ती शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात खूप मोठी मदत करते.

या यशाबद्दल प्राचार्य व शिक्षण संकुल संचालक प्रा.डॉ.अरुण गायकवाड, संगणक विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रीती देशमुख, AI-DS विभाग प्रमुख प्रा. अश्विनी मोटे, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. अविनाश पाटील तसेच सर्व शिक्षक वृंदांनी तिचे अभिनंदन केले. क्रीडा प्रमुख प्रा. विवेक बामणे यांनी परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक चेअरमन प्रा. डॉ. जी. के. देशमुख, व्हाईस चेअरमन श्री. मधुकर कटकधोंड तसेच सचिव श्री.रोहित देशमुख यांनी तिचे कौतुक केले तसेच तिला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.